
http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 7, July 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरुप, कारणे व परिणाम



**प्रा.डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार**

सहयोगी प्राध्यापक आर्थशास्त्र विभाग,

दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि. नांदेड

ई-मेल :- drmadhavbiradar65@gmail.com

**RESEARCH PAPER**

## प्रास्ताविक

शहर किंवा नगर हे मानवी समुदायाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा असुन शहरे हे मानवाच्या प्रगतीचे प्रतिके आहेत. ग्रीक वास्तूशास्त्राच्या मते, मानव पृथ्वीवर वसाहत करु लागल्यावर अनेक शतकं नागरीकरणाची प्रक्रिया नव्हती. धार्मिक, सांस्कृतीक, प्रशासकिय, व्यापारी, पर्यटन, बंदरे इत्यादीच्या प्रभावाने आर्थिक, सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या लोकसंख्या त्या भागात वाढून नागरीकरणाची प्रक्रिया गती घेवु लागल्याचे दिसुन येते. औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात नागरीकरणांच्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. ज्या ठिकाणी औद्योगिक वस्तुसाठी कच्चामाल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतो. तेथेच जवळपास त्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग व्यवसाय निर्माण झाले. अशा उद्योग व्यवसाया मध्ये काम करण्यासाठी आजुबाजुच्या भागातून लोक स्थलांतरीत झाले. त्यातुन गावाचा विस्तार होत गेला आणि शहराचा उदय होऊन विकास होत गेला. भारतात प्राचीन काळापासुन शहरे अस्तीत्वात होती. तथापि, ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात अनेक नवनवीन शहरे उदयास आल्याने दिसून येते.

 *©EIJMR All rights reserved.*

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नागरीकरणाची प्रक्रीया अधिक वेगाने सुरु झाली. साधारणपणे पंचवार्षीक योजनेमुळे औद्योगीकरणास चालना मिळाली. दळणवळण क्षेत्रात अनेक सुधारणा घडुन आल्या. त्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. नोकरी, व्यापार, व्यवसाय, उद्योग, वैद्यकिय सोयी-सुविधा, मनोरंजन, शिक्षण, आरोग्य इत्यादी कारणामुळे भारतामध्ये ग्रामीण लोकसंख्येचे शहरी भागाकडे स्थलांतर वाढत गेल्यामुळे शहरीकरणाचा वेगही वाढत गेल्याचे दिसुन येतो. दुसरे की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या लोकसंख्येतही वेगाने वाढ घडुन आली. या सर्वाचा परिणाम म्हणुन नागरी लोकसंख्येच्या बरोबरच शहरांची संख्याही वाढत गेली. प्रस्तुत शोध निबंधात महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरुप कारणे व परिणाम यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**नागरीकरणाची संकल्पना :-**

नागरीकरणाची प्रक्रिया ही दीर्घकालीन असुन या प्रक्रियेमुळे मुळ लोकसंख्येतील वाढ आणि बाहेरुन आलेल्या स्थलांतरीत व्यक्तीचा समावेश होतो. साधारणतः ज्या भू-भागावर दाट लोकवस्ती आहे, व्यवसाय प्रामुख्याने बिगरशेती स्वरुपाचा आहे त्यास नगर असे म्हटले जाते. भारताच्या जनगणना अहवालानुसार नगरची व्यख्या अशी आहे की, (अ) जेथे नगरपरिषद, नगरपालीका, महानगरपालीका, कॉन्टोनमेंट बोर्ड आहे असा भाग, (ब) या खेरीज किमान लोकसंख्या 5000 व काम करणाऱ्या पुरुषांपैकी 75 टक्के पुरुष बिगरशेती व्यवसायात गुंतलेले आहेत, (क) लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमिटरला किमान 400 आहे, या अटींची पुर्तता करणारे क्षेत्र हे नगर समजले जाते. याशिवाय औद्योगिक विकासासाठी नव्याने विकसित झालेले क्षेत्र, प्रकल्पाच्या निमित्ताने स्थापन झालेल्या वसाहती, रेल्वे वसाहती, महत्वाची पर्यटन केंद्रे यांचा नगर विभागात समावेश हातो. नेल्स अंडरसनच्या मते ज्या ठिकाणी उद्योगशिलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपुर्ण जीवनपद्धती नवीन तयार होते त्यास नागरीकरण असे म्हणतात तर ओल्सच्या मते, खेड्यातील लोक शहराकडे जाणे म्हणजे नागरीकरण होय. लोकसंख्याशास्त्रानुसार विशिष्ठ कालखंडानुसार एकुण लोकसंख्येच्या तुलनेत नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होत जाणे म्हणजे नागरीकरण होय.

थोडक्यात शहरात वा नागरीक्षेत्रात लोकसंख्या स्वकेंद्रीत होण्याची प्रक्रिया असून एकुण लोकसंख्येपैकी शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या टक्केवारीत होणारी वाढ यालाच नागरीकरण असे म्हणतात.

**महाराष्ट्रात नागरीकरणाची प्रवृती :-**

01 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, कोंकण या प्रदेशाचा समावेश आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ 307717 चौरस किलोमिटर असुन क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या एकुण क्षेत्रफळापैकी 9.36 टक्केहुन अधिक क्षेत्रफळ महाराष्ट्राने व्यापलेला आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाली त्यावेळेस महाराष्ट्रात 26 जिल्हे व229 तालुके होते. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात अनेक जिल्ह्याचे व तालुक्याचे विभाजन करण्यात आले. सध्या महाराष्ट्रात 36 जिल्हे असुन राज्यातील तालुक्यांची संख्या 355 इतकी आहे. स्थानिक प्रशासनासाठी ग्रामीण भागात 34 जिल्हा परिषदा, 351 पंचायत समित्या, 27896 ग्रामपंचायती आहेत तर नागरी भागात 27 महानगरपालीका, 241 नगरपरिषदा, 126 नगरपंचायती आहेत. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असली तरी ग्रामीण लोकसंख्येच्या एकुण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात घट होत असुन नागरी लोकसंख्येच्या एकुण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात वाढ होत आहे. गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रात औद्योगिकरणाला सुरुवात झाल्याने मोठ्या

 ©EIJMR All rights reserved.

शहरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मोठ्या शहरामध्ये रोजगार, व्यवसाय व नोकऱ्याची संधी असल्याने गामीण भागातील लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतर होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असुन शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. महाराष्ट्रात औद्योगिकरणाची प्रक्रिया अधिक गतीमान झाल्याने महाराष्ट्र हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक दृष्ट्या महत्वाचे केंद्र बनले आहे. त्याचा परिणाम म्हणजे नागरीकरणात झालेली वाढ होय.

सन 1961 ते 2011 या पन्नास वर्षाच्या काळातील महाराष्ट्रातील नागरीकरणाची प्रकृती पुढील तक्त्यामध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता : महाराष्ट्रातील नागरीकरणाची प्रवृत्ती

| वर्षे | एकुण लोकसंख्या (कोटीमध्ये) | नागरी लोकसंख्या (कोटीमध्ये) | एकुण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण | नगराची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1961 | 3.95 | 1.12 | 28.22 | 266 |
| 1971 | 5.04 | 1.57 | 31.17 | 289 |
| 1981 | 6.28 | 2.20 | 35.03 | 307 |
| 1991 | 7.89 | 3.05 | 38.69 | 366 |
| 2001 | 9.69 | 4.11 | 42.43 | 378 |
| 2011 | 11.23 | 5.08 | 45.23 | 534 |

आधार महाराष्ट्राची जनगणना 1961 ते 2011

महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, नागरी लोकसंख्येत सातत्याने वाढ झालेली आहे. सन 1961 मध्ये राज्यतील नागरी लोकसंख्या 1.12 कोटी म्हणजे एकुण लोकसंख्येच्या 28.22 टक्के इतकी होती. 2011 च्या जनगणनेनूसार राज्यातील नागरी लोकसंख्या 5.08 कोटी म्हणजेच एकुण लोकसंख्येच्या 45.23 टक्केपर्यंत वाढलेली आहे. गेल्या पन्नास वर्षाचा विचार करता नागरी लोकसंख्येत झपाट्याने वाढ झालेली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्यात उद्योगधंद्याचा विकास होत गेला. त्यामुळे नागरी लोकसंख्या व तिचे एकुण लोकसंख्येशी असेलेले प्रमाण या दोन्ही बाबी वेगाने वाढत आहेत.

महाराष्ट्रातील नागरीकरणाचे आणखी एक वैशिष्टे म्हणजे नगरांची संख्या देखील सातत्याने वाढत आहे. 1961 मध्ये महाराष्ट्रातील नगरांची संख्या 266 एवढी होती. ती 2011 मध्ये 534 पर्यंत वाढलेली आहे. म्हणजेच महाराष्ट्रात नगरांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरीकरणाचा वेग राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. भारतातील नागरीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो.

**नागरीकरणाची कारणे :-**

महाराष्ट्रातील नागरी विकासाची व नागरीकरणाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.



Scanned with Oken Scanner

1) **लोकसंख्या वाढ :-** महाराष्ट्राची लोकसंख्या 1961 मध्ये 3.95 कोटी होती ती 2011 मध्ये 11.23 कोटी झाली आहे. त्यामुळे अनेक ग्रामीण केंद्राचे नागरी केंद्रामध्ये रुपांतर होत गेले. वाढत्या लोकसंख्येत विशेषतः ग्रामीण लोकसंख्या जास्त होती ती नोकरीच्या निमित्ताने शहराकडे स्थलांतरीत झाली. त्यामुळे नागरीकरण वेगाने घडुन आलले आहे.

2) **औद्योगिकरणात वाढ :-** शहरे हे पूर्वीपासूनच उद्योगधंद्यांची केंद्रे आहेत. परंतु गेल्या काही वर्षापासुन महाराष्ट्रातील शहरात उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. औद्योगिकरण झालेल्या ठिकाणी लोकांना, रोजगार व नोकऱ्या मिळू लागल्यामुळे गामीण भागातील लोक शहराकडे येवुन स्थायिक होऊ लागले त्यातुन नागरीवस्त्या वाढल्या व नागरीकरण घडुन आले.

3) **दळणवळण व वाहतुकीची साधने :-** अलिकडच्या काळात राज्यात रस्ते, रेल्वे, हवाईमार्ग इत्यादीमध्ये वाढ होत गेल्यामुळे एका गावातून दुसऱ्या गावात जाणे-येणे सोपे झाले. तसेच पोस्ट, टेलिफोन, भ्रमणध्वनी यामुळे एका क्षणात दुसऱ्या ठिकाणी संपर्क साधने शक्य झाले. त्यामुळे खेडे व शहरातील अंतर कमी झाले. थोडक्यात वाहतुक व दळणवळणाच्या क्षेत्रात सुधारणा झाल्यामुळे अनेक नीवन नागरी केंद्रे उदयास आली. त्यामुळे नागरीकरणाचा वेग वाढला.

4) **व्यापार व व्यवसाय वृद्धी :-** औद्योगिकरणामुळे शहरे हे व्यापार व व्यवसायाची केंद्रे बनली. अशा शहरात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढात होत आहे. त्याचा फायदा घेण्यासाठी ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतरीत होऊ लागले. त्यामुळे अशा शहरांची प्रगती घडुन आली. परिणामतः नागरीकरणाचा वेग वाढला.

5) **घरगुती उद्योगांना उतरती कळा :-** औद्योगिकरणामुळे कारखानदारीला चालना मिळाली. कारखान्यात तयार झालेल्या वस्तु सूबक व स्वस्त असल्याने त्यांची मागणी वाढली त्याचा परिणाम म्हणुन ग्रामीण भागातील घरगुती उद्योगांना उतरती कळा लागली. घरगुती उद्योगात बेकार झालेले लोक पोट भरण्यासाठी शहराकडे स्थलांतरीत झाले. त्यामुळे शहरांची संख्या वाढली व नागरीकरणास चालना मिळाली.

6) **सेवा क्षेत्रांचा वाढता विस्तार :-** औद्योगिकरणाचा परिणाम म्हणुन शहरामध्ये सेवाक्षेत्राचे जाळे वाढत आहे. शिक्षणाच्या सोयी, उत्तमप्रतीच्या आरोग्यविषयक सेवा-सुविधा, मनोरंजनाची साधने, वीज, पाणी, बँका, विमा इत्यादी सेवा सुविधा शहरामध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत, त्यांमुळे ग्रामीण भागातील लोक शहरात येवुन स्थायीक होतात. त्यातून नागरीकरण वेगाने वाढते.

7) **व्यक्ती विकासाची संधी :-** ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात व्यक्तीला आपल्या सुप्तगुणांचा विकास करण्यास पोषक वातावरण असते. शिक्षण, साहित्य, संगीत, राजकारण, समाजकारण, क्रीडा, नाट्य, सिनेमा, व्यवसाय, व्यापार, वगैरे विविध

Scanned with Oken Scanner

क्षेत्रात कार्य करण्याची संधी शहरामध्ये उपलब्ध असतात त्यात प्रगती करणे सहज शक्य होते. म्हणुन ग्रामीण भागातील लोक शहराकडे आकर्षीत होतात, त्यातून नागरीकरणाला चालना मिळते.

8) **शहरी जीवनाचे वाढते आकर्षण :-** ग्रामीण जनतेला शहराचे आकर्षण असते. कारण शहरामध्ये शहरी झगमगाट, चैनी, विलासी व आरामदायी जीवन जगण्याची संधी, हॉटेल्स, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, करमणुकीची ठिकाणे, त्याचप्रमाणे दवाखाने, विविध वस्तुच्या बाजरपेठा, सुरक्षितता मुक्त वातावरण, जातीविरहित समाज व्यवस्था इत्यादीमुळे ग्रामीण श्रीमंत लोक व इतर लोक शहराकडे स्थलांतरीत होत असतात. त्यामुळे नागरीकरण वेगाने घडुन येते .

**नागरीकरणाचा परिणाम :-**

नागरीकरण हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक प्रगतीचे लक्षण असले तरी शहरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातील प्रमुख्या समय्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) लोकसंख्येचा ओघ खेड्याकडून शहराकडे येत असल्यामुळे खेडी अविकसित राहिली. ग्रामीण भागाचा वकास अपुर्ण स्वरुपाचा राहीला.
2) नागरीकरण वाढल्यामुळे राज्यातील शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या प्रमाणात घट झाली. त्यामुळे शेती विकासात अडसर निर्माण झाला.
3) शहरामध्ये वाढत चाललेली गर्दी वाहतुकीच्या समस्या, वाढती गुन्हेगारी तसेच संप, मोर्चे, मिरवणुका इत्यादीमुळे पोलीस यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण होऊन अंतर्गत शांतता व सुव्यवस्था कोलमडली आहे.
4) शहरामध्ये जास्त प्रमाणात नागरीकरण झाल्यामुळे गलिच्छ वस्ती, झोपडपट्टी बरोबरच पर्यावरण प्रदुषणाचा प्रश्न निर्माण झ ाला. त्यामुळे तेथील लोकांचे आरोग्य धोक्यात येण्याचे प्रमाण वाढले.
5) वाढत्या नागरीकरणामूळे शहरी लोकांना महागाईला सतत सामोरे जावे लागते. शहरामध्ये महागाईचा दर नेहमीच जास्त असतो त्यामुळे त्याचा उपभोगावर परिणाम होतो.
6) नागरीकरणामुळे विषमयत वाढलेली दिसुन येते. राज्यातील काही जिल्हे विकसित तर काही अजूनही कमी विकसीत आहेत.

**सारांश :-**

नागरीकरण ही विकास प्रक्रियेमधील एक अपरिहार्य घटना असली तरी नागरीकरणाच्या विस्तारासाठी व विकासासाठी निश्चित वास्तव उपायोजना केल्यास नागरीकरणाच्या समस्या निर्माण होणार नाहीत. शासनाने ग्रामीण औद्योगिकरणावर भर देवुन स्थानिक गरजा पुर्ण करणारे व कृषी क्षेत्रास पोषक व पर्यायी छोटे उद्योग ग्रामीण भागात सुरु केल्यास रोजगार निर्मिती होऊन रोजगाराच्या निमित्ताने शहराकडे होणारे स्थलांतर रोखता येईल. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात पायाभूत सेवा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्यामुळे देखील ग्रामीण भागातून शहरीभागाकडे होणारे स्थलांतर कमी करण्यास मदत होईल तसेच नागरी लोकसंख्येचे विकेंद्रीकरण, झोपडपट्टी सुधारणा, नविन शहराचे नियोजन, निवासी पायाभूत सुविधा,

 ©EIJMR All rights reserved.

Scanned with Oken Scanner

गर्दीवर नियंत्रण, यातून अनेक समस्येचे निर्मूलन होण्यास मदत होईल व अतिनागरीकरणाचे विघातक परिणाम कमी करता येणे शक्य होईल. सारांशाने सरकार निर्मिती प्रयत्नांनी नागरीकरणाच्या समस्येवर उपया योजना करणे शक्य आहे.

## संदर्भसूची


1) रुद्रदत्ता / सुंदरम, भारतिय अर्थशास्त्र, एस चांद ॲन्ड कंपनी, नवी दिल्ली

2) कुपणकुमार पुजारी, वैद्यकीय समाजशास्त्र,कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद

3) सवदी एस. बी. नागरी भुगोल, फडके प्रकाशन, कोल्हापुर

4) कदम एस.बी. मानव पर्यावरण आणि प्रदूषण, फडके प्रकाशन, कोल्हापुर

5) मुळे संजीवनी, महाराष्ट्रातील नागरीकरण विकासास पोषण की मारक, अर्थसंवाद खंड 23 अंक 2 1999

6) माधव बिरादार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

7) महाराष्ट्राची आर्थिक पाहणरी 2017-18

8) Census of India 1961 to 2011


Scanned with Oken Scanner